MHNG080017182019

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०४.०९.२०१९ |
| नोंदणी दिनांक | : | ०४.०९.२०१९ |
| निकाल दिनांक | : | ०८.०४.२०२६ |
| कालावधी | : | ०६ व. ०७ म. ०४ दि. |

## कामठी येथील न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, न्यायालय क्रमांक ०३ यांचे न्यायालयात
## (पिठासीन अधिकारी क्यु.आर.सय्यद)

**संक्षिप्त फौजदारी खटला.क्र. १२८०/२०१९ नि.क्र.३७**

**नमुना–अ**

| | |
|---|---|
| फिर्यादि | महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन कन्हान<br>ता. पारशिवनी जि. नागपूर. |
| उपस्थिती | सरकार तर्फे सहा.सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती ए.एम.भिवगडे |
| आरोपी | **रामप्रसाद नागो पारधी**<br>वयः– ५३ वर्षे, व्यवसायः– ट्रक चालक.<br>रा. शंकर नगर कांद्री कन्हान, ता.पारशिवनी, जि.नागपर |
| उपस्थिती | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री नितेश वासनिक |

**नमुना–ब**

| | |
|---|---|
| घटना दिनांक | ०५.०५.२०१९ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०५.०५.२०१९ |
| दोषारोप दिनांक | १७.०६.२०२३ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०३.११.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | –––––––निरंक–––––––– |
| न्यायनिर्णय तारीख | ०८.०४.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | –––––––निरंक–––––––– |

## नमुना–क

| अ. क्र. | आरोपी चे नाव | अटक तारीख | जमानत वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रामप्रसाद नागो पारधी | १३.०५.२०१९ | १३.०५.२०१९ | कलम २७९,३३७ , ३३८ भा.द.वि. | निर्दोष | निरंक | निरंक |

## नमुना–ड

**सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

**<u>अ– सरकारी साक्षीदार</u>**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | दिनेश जयविजय जगनाडे | पंच साक्षदार |
| सा.क्र.०२ | दिलीप शामराव बावने | पंच साक्षदार |
| सा.क्र.०३ | डॉ. योगेश नारायण चौधरी | साक्षदार |

**ब– बचावपक्ष साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क– न्यायालय साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशानी**

**अ–सरकारी**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १४ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | २० व २१ | जखमींची तपासणी पत्र |
| ३ | २२ | मेडीको लिगल सर्टीफिकेट |

| | | |
|---|---|---|
| ४ | २३ | मडीको लिगल सर्टीफिकेट |

**ब–बचावपक्ष**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क–न्यायालय**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड–जप्त मुद्देमाल**

| अ.क्र. | वर्णन | निशानी क्रमांक |
|---|---|---|
| निरंक | निरंक | – |

## न्यायनिर्णय

## (आज दिनांक ०८.०४.२०२६ रोजी जाहीर)

आरोपीला भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम २७९, ३३७, ३३८ भां.द.वी अन्वये दोषारोपीत करण्यात आलेले आहे.

**०२. अभियोग पक्षाप्रमाणे खटल्याची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः–**

फिर्यादी मंगेश अशोकराव चौधरी यांनी फिर्याद दिली की, दि.०५.०५.२०१९ रोजी त्याच्या घराजवळ राहणारा नरेश निलकंठ ठाकरे याचे नातेवाईकांचे लग्न खुमारी तह रामटेक या ठिकाणी असल्याने ते व नरेश असे दोघे नरेश चे मोटर सायकल क्र.एम.एच.३१ डी.आर.९६६० हिरो होन्डा फॅशन गाडीने त्यांच्या राहत्या घरुन कन्हान मार्गाने खुमारी येथे जात असतांना व मोटर सायकल नरेश हा चालवत होता. त्या दरम्यान कन्हान येथील चालु टोल नाका येथे पोहचल्यावर त्यांच्या मोटर सायकल समोर टर्निंग वरती ट्रक क्र.एम.एच.४० ६३४१ हा अचानक पणे भरधाव वेगाने व निष्काळीपणे नेऊन मोटर सायकलला

समोरुन जोराने वळन घेऊन व आमोरा समोर येऊन त्यांच्या मोटर सायकलला समोरुन जोरात धडक दिली त्यामुळे ते दोघेही लगेच खाली पडले व त्या अपघातामुळे फिर्यादीच्या उजव्या साईडच्या जबड्यावरती, पायावरती व छातीवरती जोरात मार लागला तसेच नरेश याला कपाळावरती नाकावरती व शरीराच्या इतर भागावरती जबर मार लागुन तो सुद्धा जख्मी झाला व त्यांना लोकांनी अम्ब्यूलेंस मध्ये आणुन कन्हान च्या सरकारी दवाखान्यात भर्ती केले असुन नरेश ला जबर मार लागल्याने त्याचा उपचार दवाखान्यात घेत असुन फिर्यादीला सुद्धा मार लागला आहे म्हणून ट्रक क्र.एम.एच. ४० ६३४१ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजी पणे चालवून फिर्यादी व त्याच्या मित्र नरेशचा अपघात घडवुन आणला आहे.

०३. पोलीस ठाणे कन्हान यांनी सदर गुन्हा क्र. २९०/२०१९ भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३३८ अन्वये नोंद करुन त्याचा तपास नरेश विठोबा वरखडे यांना दिला. तपास पुर्ण झाल्यानंतर भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३३८ भां.द.वी अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

०४. या न्यायालयाने आरोपीविरुध्द दोषारोप नि. क्र. १६ वर भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ भां.द.वी प्रमाणे निश्चित केले व आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचुन समजावुन सांगितला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे कथन करुन फौजदारी संपरिक्षेची मागणी नि.क्र.१७ वर केली.

०५. अभियोगपक्षाने आरोप सिध्द करण्यासाठी तीन साक्षीदाराची साक्ष नोंदवली. पुरावा मिळुन आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ चे बयाण नि.क्र.३५ वर नोंदविण्यात आले.

०६. न्यायनिर्णयाच्या निश्चितीकरीता माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक ०५.०५.२०१९ रोजी ११.०० वाजता मौजा बंद टोल नाका, मनसर रोड येथे आरोपी त्यांच्या ताब्यातील ट्रक क्र.एम.एच.४०/६३४१ हे सार्वजनिक रस्त्यावर मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत/क्षती पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालविला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम २७९ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर हयगयीने व बेदरकारपणे चालवून मंगेश चौधरी यांच्या गाडीला समोरुन धडक देऊन फिर्यादीला व त्याच्या मित्राला खाली पाडुन दुखापत करण्यास कारणीभुत ठरले आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३३७ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ३ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर हयगयीने व बेदरकारपणे चालवून मंगेश चौधरी यांच्या उपरोक्त वाहनाला समोरुन धडक देऊन मागे बसलेला मित्राला खाली पाडून पाय फ्रॅक्चर करुन त्याला गंभीर जखमी होण्यास कारणीभुत ठरले आणि त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम ३३८ अन्वये गुन्हा केला ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

०७. सरकारी वकील श्रीमती ए.एम.भिवगडे व आरोपीचे वकील श्री. नितेश वासनिक यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबतः–**

०८. यातील मुद्दे क्र. १ ते ३ एकमेकांशी निगडीत असल्यामुळे व पुरावा सारखा असल्यामुळे एकत्रीत विचारार्थ घेण्यात आलेले आहेत. आरोपी वर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याकामी फिर्यादी पक्षाने सिध्द केले पाहिजे की, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रक हयगय व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादी व त्याच्या मित्राला दुखापत पोहोचविली.

०९. आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरीता सरकारपक्षाने पंच साक्षदार दिनेश जयविजय जगनाडे (सा.क्र.१) व साक्षदार दिलीप शामराव बावने (सा.क्र.२) यांची साक्ष नोंदविली त्यात त्यांनी कथन केले आहे की, दि.०५.०५.२०१९ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्यासाठी ११.३० ते १२.०० च्या दरम्यान बोर्डा टोलनाका येथे बोलविले होते. पोलीसांनी त्यांच्या समोर पंचनामा तयार केला होता. दोन्ही साक्षदारांनी पंचनाम्यास नि.क्र.१४ सिद्ध केले. त्याच्या सोबत दिलीप बावने हे देखील होते. साक्षदाराचे उलटतपास करण्यात आले परंतु कोणतीही विसंगती अभिलेखावर आलेली नाही.

१०. सरकारी साक्षदार डॉ.योगेश नारायण चौधरी यांनी असे कथन केले की, त्यांचे शिक्षण एमबीबीएस पर्यंत झालेले आहे. दिनांक ०१.०३.२०१३ रोजी ते कन्हान येथील प्राथमीक आरोग्य केंद्र येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत

होते. दिनांक ०५.०५.२०१९ रोजी पोलीस स्टेशन कन्हान यांनी त्यांना अपघातातील जखमींची तपासणी करण्यासाठी दोन पत्र दिले होते. सदर दोन्ही पत्र त्यांना दाखवीले. ते तेच असून त्यावर त्यांची स्वीकारणार म्हणून सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे नि.क्र. २० व २१ देण्यात आले. त्यांनी दोन्ही जखमींची तपासणी केली. त्यातील एका जखमीचे नाव मंगेश अशोकराव ठाकरे असे होते. त्याला तपासणीदरम्यान सात प्रकारच्या जखमा झाल्याचे दिसले. त्यापैकी सहा जखमा किरकोळ स्वरूपाच्या होत्या व एक जखम गंभीर स्वरूपाची त्याच्या चेह–यावर होती. सदर जखमीवर प्राथमीक उपचार करून त्याला पुढील उपचारसाठी मेडीकल हॉस्पीटल, नागपूर येथे पाठवीले. त्यांना मेडीको लिगल सर्टीफिकेट दाखविले ते तेच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याने कथन केले. त्यावर त्यांची, पोलीसांची व जखमींची सही नि.क्र.२२ वर आहे. दुस–या जखमीचे नाव नरेश ठाकरे असे होते. त्याला तपासणीदरम्यान चार प्रकारच्या जखमा झाल्याचे दिसले. चारही जखमा किरकोळ स्वरूपाच्या होत्या. सदर जखमीचा रक्तदाब वाढल्यामुळे त्याला पुढील उपचारसाठी मेडीकल हॉस्पीटल, नागपूर येथे पाठवीले. सदरील साक्षदाराने जखमी प्रमाणपत्र नि.क्र.२२ व २३ सिद्ध केले. उलटतपासादरम्यान कोणतीही विसंगती आलेली नाही.

**११.** अभिलेखावर आलेल्या पुराव्यानुसार फिर्यादी व त्याचा मित्रास दुखापत झाल्याचे सिद्ध होते व तसेच ज्या ठिकाणी घटना घडली तो घटनास्थळ सिद्ध होतो. परंतु मोटरसायकल चालविणारा फिर्यादी किंवा त्याचा मित्र होता हे सिद्ध होत नाही. तसेच ज्या वाहनाच्या चालकाने फिर्यादीच्या मोटरसायकलला धडक दिली त्या वाहनाचा चालक आरोपीच होता हे सिद्ध होत नाही. एकंदरीत

रित्या सरकारपक्षाचा पुराव्याच्या अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की प्रकरणात फिर्यादी हे महत्त्वाचा साक्षीदार असुन इतर कोणतेही साक्षदार त्याच्या जबाबात असे आले नाही की त्याने घटना ही प्रत्यक्ष पाहिली. त्यामुळे सरकारपक्षाचा कथनांबद्दल संशय येतो आणि संशयाचा फायदा मिळुन आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरत असतो. परिणामी मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्रमांक ४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आदेश :**

१. आरोपी रामप्रसाद नागो पारधी याची भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ या गुन्ह्याखाली फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येते व त्यातून त्याला मुक्त करण्यात येते.

३. आरोपीला असे निर्देशित करण्यात येते की फौ.प्र.सं क्र.४३७-अ अन्वये या न्यायालयाचे न्यायनिर्णया विरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा अर्ज दाखल झाल्यास त्यांचे समोर हजर रहाण्याकरता सहा महिन्याच्या कालावधीकरीता रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व तितक्याच रकमेचा जामीन देण्यात यावा.

Digitally signed by SYED QAYEMODDIN
Date: 2026.04.08 17:34:35 +0530

ठिकाणः- कामठी
दिनांक:-०८.०४.२०२६

(क्यु.आर.सय्यद)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग
न्यायालय क्र. ०३,कामठी.

ENDORSEMENT

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 08.04.2026 |
| Judgment dictated on | : | 08.04.2026 |
| Transcription ready on | : | 08.04.2026 |
| Judgment checked and signed on | : | 08.04.2026 |

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File are same word to word as per original Judgment.

**Name of Steno :- Vrushabh Wanjari**